**ठळक बातम्या**

- रशिया आणि युक्रेन युद्धावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढण्याच्या भारताच्या भूमिकेचा प्रधानमंत्र्यांकडून पुनरुच्चार
- राष्ट्रीय जल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान, महाराष्ट्राला पाच पुरस्कार
- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरायला सुरूवात

  **आणि**

- ‘२०२६मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधून हॉकी, क्रिकेट, बॅडमिंटन, कुस्तीसह अनेक खेळ वगळले

**<><><><><>**

रशिया आणि युक्रेन युद्धावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढण्याच्या भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केला. शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना भारताचा नेहमीच पाठिंबा असेल. त्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचीही आमची तयारी असेल, असं त्यांनी स्पष्ट केलं. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासोबतच्या चर्चेत त्यांनी ही भूमिका मांडली. ब्रिक्स परिषदेच्या निमित्तानं रशियातल्या कझान शहरात त्यांची ही भेट झाली. कझान शहराशी भारताचे जुने संबंध आहेत. इथं भारताचा दुतावास सुरू केल्यानं दोन्ही देशातले संबंध आणखी दृढ होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले. पुतीन यांनीही या निर्णयाचं स्वागत केलंय. ब्रिक्स समुहानं गेल्या १५ वर्षात वेगळी ओळख निर्माण केली आहे आणि अनेक देश या समुहात येण्यासाठी इच्छुक असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

भारत आणि रशियातले संबंध खोलवर रुजलेले आहेत. हे संबंध आणखी बळकट करण्यासाठी विविध क्षेत्रात द्विपक्षीय भागिदारी दृढ करण्यावर दोन्ही देशांचा भर आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशनमुळे ग्रामीण भागात राहणाऱ्यांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दिली. जलशक्ती मंत्रालयातर्फे दिल्या जाणाऱ्या पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या पुरस्कारांसाठी सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, शाळा किंवा महाविद्यालय, उद्योग, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ती संघटना, संस्था आणि नागरी संस्था अशा ९ श्रेणींमध्ये ३८ विजेते निवडण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्याच्या गटात ओडिशानं पहिला, उत्तर प्रदेशने दुसरा तर गुजरात आणि पुद्दुचेरीने संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकावला. महाराष्ट्रालाही पाच जलपुरस्कार मिळाले आहेत.

**<><><><><>**

देशातल्या सर्व ८ कोटी दूध उत्पादक शेतकऱ्यांना सहकारी पायाभूत क्षेत्राशी जोडलं जाईल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज गुजरातमध्ये आणंद इथं राष्ट्रीय दुग्धविकास महासंघाच्या हीरक महोत्सवी समारंभात बोलत होते.

देशात दुग्धोत्पादन क्षेत्रात ६ टक्के दरानं दरवर्षी वाढ होत असून जागतिक दूध उत्पादन वाढीपेक्षा हा वेग  अधिक आहे. येत्या पाच वर्षांत देशात २ लाख सहकारी

दुग्ध संस्था स्थापन केल्या जातील अशी घोषणाही त्यांनी केली. राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत सुरु असलेल्या अनेक उपक्रमांचं त्यांनी कौतुक केलं.

**<><><><>**

स्वतःचे फोर जी तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या  जगातल्या सहा देशांपैकी भारत हा एक देश असून लवकरच फाईव्ह जी तंत्रज्ञान विकसित केलं जाईल, असं प्रतिपादन केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज दिल्ली इथं केलं. बी एस एन एल  अर्थात भारत संचार निगम लिमिटेड च्या नव्या लोगोचं  आणि नव्या ७ सेवांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते आज झालं. त्यावेळी ते  बोलत होते.  बी एस एन एल च्या वापरकर्त्यांची संख्या गेल्या सहा महिन्यात ७५ लाखांवरून १ कोटी ८० लाख इतकी झाली  आहे.  बी एस एन एल  आता  स्पॅम फ्री नेटवर्क , नॅशनल वाय फाय रोमिंग , इंट्रानेट फायबर टीव्ही , डायरेक्ट टू डिव्हाईस, जनतेचं संरक्षण आणि आपत्ती निवारण  यासारख्या  सात सेवा ग्राहकांना पुरवणार आहे.

**<><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकासाठी स्थापन झालेल्या संसदेच्या संयुक्त समितीनं तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांना पुढच्या बैठकीला हजेरी लावायला मनाई केली आहे. संसदेत आज झालेल्या बैठकीत बॅनर्जी यांनी गैरवर्तन केल्यानंतर हा निर्णय झाला. भाजपा खासदार अभिजित गंगोपाध्याय यांच्यासोबत बॅनर्जी यांचा वाद झाला, त्यानंतर त्यांनी गैरवर्तन केल्याचं सुत्रांनी सांगितलं. ओडिशातल्या काही संघटना आणि इंडियन युनियन ऑफ मुस्लिम लीगच्या खासदाराचं म्हणणं ऐकून घेताना हा प्रकार घडला.

**<><><><>**

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी डेरा सच्चा सौदाचा प्रमुख गुरमीत राम रहीम सिंग याच्या विरोधात २०१५ साली दाखल झालेल्या खटल्यांची सुनावणी करायला मंजुरी दिली आहे. डेरा सच्चा सौदाच्या राष्ट्रीय समितीच्या तीन सदस्यांविरोधात खटला चालवायलाही राज्य सरकारनं यावेळी मंजुरी दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज प्रसिद्ध झाली असून राज्यातल्या सर्व २८८ मतदारसंघांमधे एकाच टप्प्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज आजपासून भरता येतील. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची अधिसूचनाही जारी झाली आहे. काँग्रेस खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली आहे. पोटनिवडणुकीसाठीचं मतदानही २० नोव्हेंबरला होणार असून मतमोजणी २३ नोव्हेंबरला होईल.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी झाली असून या अनुषंगाने विविध जिल्ह्यात तयारी सुरू झाली तसंच उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात झाली आहे.

पहिल्या दिवशी **सातारा** जिल्ह्यात अपेक्षांचे ६ अर्ज दाखल झाले. **परभणी** जिल्ह्यात तीन जणांनी अर्ज दाखल केले. **जालना** जिल्ह्यातल्या परतूर, घनसावंगी,

जालना, बदनापूर आणि भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघासाठी आज २ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. **गडचिरोली** जिल्ह्यातल्या अहेरी विधानसभा मतदारसंघात दीपक आत्राम यांनी अपक्ष उमेदवार म्हणून आपला अर्ज दाखल केला. **सोलापूर जिल्ह्यात** तीन अर्ज दाखल झाले आहेत. धाराशिव, कोल्हापूर, परभणी जिल्ह्यात इच्छुकांनी उमेदवारी अर्जांची खरेदी केली.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात **उद्या पालघर** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात ३८ जागांसाठी मतदान होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल आणि १ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

झारखंडमधे पहिल्या टप्प्यातलं मतदान येत्या १३ नोव्हेंबरला होणार असून, या टप्प्यासाठी आतापर्यंत २५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. राज्याच्या ग्रामीण भागात मतदानाची वेळ कमी करण्यात आल्याचा झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते सुप्रियो भट्टाचार्य यांचा आरोप निवडणूक आयोगानं फेटाळला आहे. नक्षलवाद्यांचा

प्रभाव असलेल्या फक्त ९८१केंद्रांवर मतदानाची वेळ सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. इतर ठिकाणी मतदानाची वेळ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असणार आहे. अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी दिली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात काल झालेल्या चकमकीत ठार झालेल्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या २ मोठ्या म्होरक्यांचा समावेश आहे. दोघांवरही प्रत्येकी १६ लाख रुपयांचं बक्षीस होतं. या सर्वांची ओळख पटल्यानंतर पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज ही माहिती दिली. जया उर्फ भुरी पदा आणि सावजी उर्फ अंकलू तुलावी हे दोघे कालच्या चकमकीत मारले गेले.

<><><><><>

आगामी राष्ट्रकूल स्पर्धांमधून हॉकी, क्रिकेट, कुस्ती, बॅडमिंटन, स्क्वॅश आणि टेबल टेनिस सह अनेक खेळ वगळण्यात आले आहेत. यातल्या बहुतांश खेळांमध्ये भारताची पदकं निश्चित असतात. स्कॉटलंडमधल्या ग्लासगो शहरात २०२६ मध्ये होणाऱ्या या स्पर्धांमध्ये केवळ १० खेळांचा समावेश असणार आहे. त्यात ॲथलेटिक्स,  जलतरण, आर्टिस्टिक जिम्नस्टिक, सायकलिंग, नेट बॉल, भारोत्तोलन, मुष्टीयुद्ध, ज्युदो, बाऊल्स, बास्केटबॉल यांचा समावेश आहे. यातल्या काही खेळांमध्ये दिव्यांग खेळाडूही सहभागी होणार आहेत.

<><><><><>

बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेलं  ‘दाना’ चक्रीवादळ ओदिशा किनारपट्टीच्या दिशेनं पुढे सरकत आहे. हे वादळ येत्या गुरुवार आणि शुक्रवार

दरम्यानच्या मध्यरात्री ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर तीव्र चक्रीवादळाच्या स्वरूपात धडकेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

ओदिशा किनारपट्टीवरच्या भितरकणिका आणि धामरा दरम्यान हे वादळ धडक देईल, असा अंदाज हवामानाच्या अनेक मॉडेल्सनं वर्तवला आहे. त्यामुळे या भागातल्या सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे.

वादळाच्या प्रभावामुळे उद्यापासून या भागात पाऊस जोर पकडणार असून, हवामान विभागानं मयूरभंज, कटक, जाजपूर, बालासोर, भद्रक, केंद्रपारा, खोरधा, केओंझार, पुरी आणि जगतसिंगपूर या भागाला  येत्या गुरुवारी पावसाचा आणि पुराचा रेड अलर्ट जारी केला आहे. ओदिशाच्या किनारपट्टी भागात एनडीआरएफ नं आपत्कालीन प्रतिसादासाठी आपल्या ११ तुकड्या तैनात केल्या असून, भारतीय लष्कर, नौदल आणि तटरक्षक दल देखील बचाव कार्यासाठी सज्ज आहे.

चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ओदिशा सरकारनं किनारपट्टी भागातल्या आणि लगतच्या १४जिल्ह्यांमधल्या सर्व शाळा उद्यापासून तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा ओदिशा राज्याचा तीन दिवसांचा पूर्वनियोजित दौरा पुढे ढकलण्यात आला आहे.